**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ / आश्विन १८, १९४४ (शके)**

## १३०. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी सुरु होऊन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण १९४ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ३८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण १५६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ६६ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली असून ९० प्रलंबित निवेदनांपैकी २२ निवेदने गुरुवार, दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित ६८ निवेदनांपैकी १४ निवेदने गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. तसेच, प्रलंबित ५४ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १२ निवेदने गुरुवार, दिनांक ३० जून, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. प्रलंबित ४२ निवेदनांपैकी १० निवेदने सोमवार, दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. एकूण प्रलंबित ३२ निवेदनांपैकी ५ निवेदने दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२६ अन्वये वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण २७ प्रलंबित स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १ निवेदन शाखेत प्राप्त झाले असून ते यासोबत वितरीत करण्यात येत आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १० ऑक्टोबर, २०२२.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सुचना क्र.४६

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवशेन

सर्वश्री. बबनराव लोणीकर, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, अभिमन्यु पवार, नारायण कुचे व राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ४६ पुढील प्रमाणे आहे:-

"जालना जिल्हयातील अंबड, घनसावंगी, परंतुर तालुक्यातील शेतकऱ्याच्या लाभक्षेत्रातील जमिनी ३० वर्षापासून संपादित करण्यात येणे, या जमिनीच्या ७/१२ वर मागील २० वर्षात मूळ मालकाचे नाव असणे, परंतु सदयस्थितीत संबंधीत ७/१२ वर महाराष्ट्र शासनाच्या नावाच्या नोंदी येणे. आज या जमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात असणे. या जमिनी ३ हजार रुपये एकरी भावाने घेण्यात आल्या असणे. सदरहू जमिनी मूळ शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात अशी शेतकऱ्यांची मागणी असणे. या जमिनीचा लिलाव करण्यात आल्यास शेतकरी भूमीहिन होऊन निराधार होणार असणे. पैठण धरणग्रस्तांना जमिनी देण्याबाबत जिल्हाधिकारी. जालना यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद याना वारंवार पत्र पाठवून ताब्यात घेण्याबाबत कळविले असणे, तथापि धरणग्रस्तांची जमिनी घेण्याबाबत उदासिनता दिसून येणे. ज्या उद्देशाने जमिनी संपादित केल्या त्या तीन वर्षात सदरहू उद्देशासाठी वापरण्यात आल्या नाहीत तर त्या शेतकऱ्यांना परत करण्याची संबंधीत अधिनियमात तरतूद असणे, याबाबत शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री ( मदत व पुनर्वसन ) यांचे निवेदन:-

जायकवाडी प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करण्यासाठी जालना जिल्ह्यात अंबड, घनसावंगी व परतुर तालुक्यात एकुण ३४९७.१५ हेक्टर जमीन संपादीत करण्यात आली असुन यापैकी १३४०.०४ हेक्टर जमीन जायकवाडी प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आली आहे व २१५७.११ हेक्टर एवढी जमीन वाटपासाठी शिल्लक आहे. परतुर तालुक्यात वाटपासाठी शिल्लक असलेल्या जमिनीवर महाराष्ट्र शासन नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच अंबड व घनसावंगी तालुक्यामध्ये अशा जमिनीवर महाराष्ट्र शासन नोंदी घेतल्या आहे. परंतु, काही जमिनींवर महाराष्ट्र शासन नोंदी घेणे बाकी असुन त्याबाबत नोंद घेण्याची कार्यवाही चालु आहे. प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यासाठी संपादीत केलेल्या जमीनी या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या असल्याने या जमिनी एकसाल लावणीसाठी देणे विषयक महाराष्ट्र ज़मीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ नुसार दरवर्षी संबधित तहसिलदार यांच्या मार्फत लिलावाद्वारे एकसाल लावणीसाठी देण्यात येते.

सदर जमिनी ह्या मुळ शेतकऱ्यांना परत करण्याबाबत श्री.कचरु कोठारी व इतर शेतकरी रा.गोंदी ता.अंबड यांनी राज्य मानवी हक्क आयोग यांचेकडे दाखल केलेल्या याचिका क्र.३५३/२०१५ c/w २१४५/२०१४ मधील दिनांक ०४.११.२०१९ चे आदेशानुसार सदर जमिनी मुळ शेतकऱ्यांना परत करणे संयुक्तीक नसल्याबाबत जिल्हाधिकारी जालना यांनी सादर केलेल्या अहवालानुसार तक्रार निकाली काढली आहे.

सदर प्रकरणी, श्री.भगवानराव ढवळे यांनी मा. मंत्री, आरोग्य तथा पालकमंत्री जालना यांना उद्देशुन लिहलेले दिनांक २७.०२.२०२२ रोजीचे निवेदन देऊन जायकवाडी डाव्या कालव्याखालील पुनर्वसन संपादीत जमिनीवर मुळ मालकांच्या सातबारावर महाराष्ट्र शासन अशी नोंद घेण्याची कार्यवाही फक्त परतुर तालुक्यापुरती झाल्यामुळे येथील शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीय योजनेचा लाभ घेता येत नाही, याबाबतचे

निवेदन जिल्हाधिकारी जालना यांना सादर केले आहे. सदर जमीन यापुर्वीच संपादीत केलेली असल्यामुळे व शासनाच्या मालकीच्या असल्याने आज रोजी शेतकरी भुमीहीन होऊन निराधार होण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १४(५) नुसार या कलमान्वये संपादन केलेल्या सर्व जमिनी ह्या भुसंचयाचा भाग असेल, अशी तरतुद आहे. तसेच कलम २० नुसार शासनाकडून ज्या प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी कोणतीही जमीन संपादीत करण्यात आलेली असेल आणि जोवर शासन किंवा अन्य कोणतेही निमशासकीय प्राधिकरण किंवा संस्था यांनी कोणतीही कार्यालये किंवा इतर बांधकामे उभारली असतील असे प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर अशी जमीन त्यावरील बांधकामासहीत विहीत केलेल्या रितीने आणि विनिर्दीष्ट करण्यात येतील, अशा अटी व शर्तीवर निकालात काढण्याचा अधिकार राज्य शासनाला देण्यात आला आहे.

तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी केरळ शासन विरुध्द एम.भास्करन पिल्लई या प्रकरणात दिनांक ०५.०५.१९९७ रोजीच्या दिलेल्या आदेशाप्रमाणे संपादीत विनावापर बिनशेती जमिनीची विल्हेवाटीबाबत दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १२.०३.२००४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असुन त्यानुसार संपादन प्रयोजनासाठी वापरुन अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या जमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर संबधीत जिल्हाधिकारी यांनी अशा बिनशेतीच्या किंवा बिनशेतीची क्षमता प्राप्त झालेल्या जमिनीची केवळ जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी, तसेच या लिलावत मुळ धारक सुध्दा सहभाग घेऊ शकतील अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

जायकवाडी प्रकल्पांतर्गत पात्र बाधित व्यक्तींना महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६ (२) नुसार पर्यायी जमिनी वाटप करण्याबाबतची नोटीस देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यामुळे लाभक्षेत्रातील संपादित जमिनी शेतकऱ्याला परत देणे संयुक्तिक होणार नाही. तसेच पाटबंधारे प्रकल्पांतर्गत बाधित झालेल्या भूधारकांच्या पुनर्वसनासाठी संपादित केलेल्या जमिनी मूळ भूधारकांना परत देणे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी तसेच पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या उद्देशाशी विसंगत आहे.

*************************